


सत्यमेव जयते

**अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुंबई- ४०० ०८८

समता न्याय एकात्मता

रजि नं.४३७६०३ Email Id- esta.arti@gmail.com website https://arti.org.in फोन नं. ०२२ - ४४५१५८५४/२५५००१९४/२५५००१९५


जा.क्र/आर्टी/योजना/JEE-NEET /२०२५-२६/०२४६ दिनांक – १४/११/२०२५

## जेईई (JEE) व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांकरिता समुपदेशन पोर्टल (Counseling Portal) मुदतवाढ बाबत

## महत्वाची सूचना

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी) मुंबई मार्फत जेईई (JEE) व नीट (NEET) परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी जेईई (JEE) प्रशिक्षणासाठी १५० व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी १५० विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता आर्टी मार्फत दि.२५/०६/२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीद्वारे दिनांक २०/०८/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने उमेदवारांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे आर्टी मार्फत दिनांक ०८/०९/२०२५ रोजीच्या घोषणापत्रकानुसार पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणासाठी जेईई (JEE) व नोट (NEET) करिता तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांची कागदपत्राची तपासणी करण्यात आलेली आहे.

दिनांक ०८/०९/२०२५ रोजीच्या घोषणापत्रकानुसार निवड झालेल्या ज्या उमेदवारांनी कागदपत्राची तपासणी पूर्ण केली आहे. अशा उमेदवारांनी त्यांच्या पसंतीची प्रशिक्षण केंद्राची निवड करण्याकरीता पोर्टल तयार करण्यात आलेले आहे. सदर पोर्टल गुरूवार दिनांक- ०६/११/२०२५ पासून सोमवार दिनांक – १०/११/२०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आले आहे. दि. १०/११/२०२५ च्या घोषणापत्रकाद्वारे विद्याथ्र्यांना पसंतीची प्रशिक्षण केंद्र निवड करण्याकरिता दि. १२/११/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तर दि. १२/११/२०२५ रोजीच्या घोषणापत्रकाद्वारे दि. १४/११/२०२५ पर्यंत विद्यार्थ्यांना पसंतीची प्रशिक्षण केंद्र निवड करण्याकरिता दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली होती . **तथापी सदरच्या घोषणापत्रकाद्वारे दि. १८/११/२०२५ पर्यंत विद्यार्थ्यांना पसंतीची प्रशिक्षण केंद्र निवड करण्याकरिता तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात येत आहे.** त्यानंतर कोणत्याही स्वरूपात मुदतवाढ देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

(सुनील वारे)

व्यवस्थापकीय संचालक

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, (आर्टी)

मुंबई